**लोक विठ्ठल रुक्माई च्या दर्शनाला पंढरपूर जातात परंतु मी शेतकऱ्याच्या दर्शनाला आलो, हेच माझे पंढरपूर : बच्चू कडू**
>> पान 2

**राहत्या बंगल्यात जळालेल्या नोटांची पोतीच्या पोती सापडलेल्या न्यायमूर्ती यशवंत वर्मांना अखेर हटवण्याची तयारी सुरु**
>> पान 3

**वाशीम बाजार समितीमध्ये चियाला उच्चांकी दर**
>> पान 4


**सुविचार**
जीवनात सामंजस्य वाढवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 301 ■ रविवार, दि. 13 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





**फिल्मफेअर अवॉर्ड्‌समध्ये अभिनेत्री तब्बूने साधला मराठीत संवाद, महेश मांजरेकरांना केलं सन्मानित...**
आतील पान


# शरद पवार यांनी भाकरी फिरवली

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षपदावरुन जयंत पाटील पायउतार; शशिकांत शिंदे नवे प्रदेशाध्यक्ष!



**मुंबई/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरुन जयंत पाटील पायउतार झाले आहेत. जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. आता शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. १५ जुलै रोजी शशिकांत शिंदे पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार आहेत. गेल्या काही दिवसांआधी जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदावरुन मुक्त करा, अशी मागणी केली होती. मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा अशी मागणी जयंत पाटील यांनी १० जून रोजी झालेल्या पक्षाच्या वर्धापन दिनीच केली होती. मला पवार साहेबांनी बरीच संधी दिली. सात वर्षाचा कालावधी दिला.**

शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. तुम्हा सर्वांदेखत साहेबांना विनंती करेन, शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. शरद पवारांनी यावर योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला बरेच पुढे जायचे आहे, असं जयंत पाटील म्हणाले होते. त्यानंतर आज जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचं प्रदेशाध्यक्षपद मिळणार असल्यासंदर्भातील बातमी प्रसिद्ध होताच शशिकांत शिंदे यांनी एबीपी माझा सोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाबाबत अजून नाव निश्र्चित नाही, पवार साहेब, सुप्रिया ताई, जयंत पाटील आणि पक्ष जो निर्णय घेईल तो मान्य असेल. १५ तारखेला पक्षाची बैठक आहे, काही नावं चर्चेत आहेत, माझंही नाव चर्चेत आहेत. ज्यावेळेला निर्णय होईल, निवड होईल त्यावेळी निश्र्चितपणानं काम करु, असं शशिकांत शिंदे म्हणाले. शशिकांत शिंदे पुढं म्हणाले, आणखी कुणाची नावं चर्चेत आहेत याबद्दल कल्पना नाही. मला तुमच्याकडून कळलेलं आहे. संघटनेच्या माध्यमातून पवारसाहेबांनी या महाराष्ट्रात इतिहास घडवला काम केल, पक्ष संघटना बांधली आहे. आज पक्षाच्या माध्यमातून काम करण्याच्या बाबतीत संघर्षाचा काळ आहे. त्यावेळेला निश्र्चितपणानं लोकांना अपेक्षित अशा प्रकारचं नेतृत्व पवार साहेबांनी उभं केलेलं आहे. जयंत पाटील यांच्या सारख्या अध्यक्षांनी ज्या पद्धतीनं काम केलेलं आहे, त्याची तुलना होऊ शकत नाही, असंही शिंदे यांनी म्हटलं. प्रदेशाध्यक्षपदाबाबत पक्षाचा अजून निर्णय झालेला नाही, पक्षाची बैठक आहे एवढाच निरोप आलेला आहे. निर्णय काय होईल तो होईल, पक्ष बांधण्याच्यासाठी संघर्षात आम्ही एकजुटीनं, एकोप्यानं उभं राहू, साहेबांच्या पक्षाची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न १०० टक्के करु, असं शशिकांत शिंदे म्हणाले.

बेरोजगारीचा प्रश्र्न आहे, आश्र्वासनं आहेत, ७५ हजार नोकऱ्या लगेच देतो, निवडणुका आल्या की आश्र्वासनांची खैरात होईल हे लोकांना पटवून द्यायचं आहे. इनकमिंग आऊटगोईंग होत असते, नवीन लोकांना संधी देणे त्यांच्याकडन नेतृत्व उभं करणं हा साहेबांचा गुण आहे. कोण जातंय, लगेच यश मिळालं पाहिजे यापेक्षा, राजकीय सामाजिक चळवळीत लोक इच्छुक आहेत त्यांना पुढं आणलं तर महाराष्ट्रात बदल घडवण्याची क्षमता आहे. सत्ता बदलते दिसल्यावर बरेच लोक मार्ग बदलात. सध्याच्या प्रकरणांवरुन जनता नाराज आहे हे तुम्हाला दिसून येईल, असं शशिकांत शिंदे म्हणाले. मला जर संधी मिळाली तर ते भाग्य समजेन, शरद पवार साहेब माझे दैवत आहेत. प्रदेशाध्यक्षपद मिळाल्यानंतर आर. आर. पाटील यांच्या सारखं काम करण्याचा प्रयत्न करेन. सगळ्यात मोठं आव्हान शेतकऱ्यांच्या प्रश्र्नांचं आहे. युवक वर्गाचे प्रश्र्न आहेत. या मुद्यांवर काम करावे लागेल, असं शशिकांत शिंदे यांनी सांगितलं.

# रोहित पवारांच्या अडचणीत वाढ

## ईडीकडून मनी लाँड्रिंग प्रकरणात पुरवणी आरोपपत्र दाखल



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आणि इतर काही व्यक्तींविरुद्ध मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा, २००२ अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल केले आहे. हा पवार कुटुंबासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

न्यायालयाने अद्याप या आरोपपत्राची दखल घेतलेली नाही, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आरोपपत्र दाखल होण्यापूर्वीच अंमलबजावणी संचालनालयाने रोहित पवार यांच्या बारामती अॅग्रो कंपनीची ५० कोटी रुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त केली होती. जानेवारी २०२३ मध्ये ईडीने बारामती अॅग्रोच्या ठिकाणांसह विविध ठिकाणी छापे टाकले. त्यानंतर, कर्जत-जामखेड मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांना चौकशीसाठी ईडीच्या मुंबई कार्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले होते.

मार्च २०२३ मध्ये ईडीने बारामती अॅग्रोच्या ५०.२० कोटी रुपयांच्या मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या, ज्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड येथे असलेली १६१.३० एकर जमीन, एक साखर कारखाना, यंत्रसामग्री आणि इमारती यांचा समावेश होता. ईडीचा दावा आहे की, ही मालमत्ता मूळतः कन्नड सहकारी साखर कारखाना लिमिटेड (कन्नड एसएसके) यांच्याकडे होती, मात्र ती बारामती अॅग्रोने कथित बनावट लिलाव प्रक्रियेद्वारे खरेदी केली. ईडीच्या मते, संबंधित मालमत्ता ही गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेच्या स्वरूपात असल्याने ती मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन ठरते.

नेमकं प्रकरण काय?

ईडीचा तपास हा ऑगस्ट २०१९ मध्ये आर्थिक गुन्हे शाखा (ईडब्ल्यूएस), मुंबई यांनी नोंदवलेल्या एफआयआरवर आधारित आहे. या एफआयआरमध्ये भारतीय दंड विधान (आयपीएस) आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांअंतर्गत अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते. एफआयआरमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (एमएससीबी) अधिकारी आणि संचालकांनी अनेक सहकारी साखर कारखाने (एसएसके) बेकायदेशीरपणे अत्यंत कमी किमतीत त्यांच्या नातेवाईकांना आणि जवळच्या खाजगी कंपन्यांना विकले. ही विक्री पारदर्शक प्रक्रिया न पाळता आणि कायदेशीर औपचारिकता टाळून करण्यात आली होती.

२००९ मध्ये एमएससीबीने कन्नड एसएसकेकडून ८०.५६ कोटी रुपयांचे थकित कर्ज वसूल करण्यासाठी त्या कारखान्याच्या मालमत्तेचा ताबा घेतला होता. त्यानंतर बँकेने संशयास्पद मूल्यांकनाच्या आधारे कमी राखीव किमतीत लिलाव प्रक्रिया सुरू केली. ईडीचा आरोप आहे की, ही लिलाव प्रक्रिया देखील गंभीर गैरव्यवहारांनी भरलेली होती. कमकुवत आणि विवादित कारणांचा हवाला देत सर्वाधिक बोली लावणाऱ्या प्रतिस्पर्ध्याला अपात्र ठरवण्यात आले, तर बारामती अॅग्रोशी जवळीक असलेल्या व्यक्तीला, ज्याची आर्थिक पात्रता आणि अनुभव संशयास्पद होता, त्याला लिलावात कायम ठेवण्यात आले.

# बीडमध्ये हिंसाचार थांबेचना; माजी सरपंचाचा तरुणावर कोयत्यानं हल्ला; युवक रुग्णालयात दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात सातत्याने घडणाऱ्या मारहाणीच्या घटना थांबण्याचं नाव घेत नाहीत. बीड तालुक्यातील साक्षाळ पिंपरी गावात माजी सरपंचाने तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. शेत रस्त्याच्या वादातून झालेल्या या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून सध्या त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रकाश काशीद असं जखमी तरुणाचं नाव आहे. साक्षाळ पिंपरी गावातील माजी सरपंच गोरख काशीद याने रस्त्याच्या वादातून प्रकाश काशीदच्या डोक्यावर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केलं. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे गावात एकच खळबळ उडाली आहे. प्रकाशला तात्काळ उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

घटनेनंतर बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गोरख काशीदविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत आरोपी माजी सरपंचाला अटक केली असून त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं आहे.


या संदर्भात बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी माहिती देताना सांगितलं की, ''साक्षाळ पिंपरी गावात झालेल्या हल्ल्याच्या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. कोयत्याचा वापर करून केलेला हल्ला हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. आरोपीविरोधात भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असल्याचं सांगितलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात विविध कारणांवरून होणाऱ्या मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. गावोगावी रस्त्याचे वाद, वैयक्तिक वाद, राजकीय कुरबुरी यामुळे अनेकांना मारहाणीला सामोरं जावं लागत आहे. यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.स्थानिक नागरिकांनी पोलिसांनी अधिक कठोर पावलं उचलावीत अशी मागणी केली आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसी परिसरातून अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे.

# आमदार संजय गायकवाडांसह अन्य एकाविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल, मुंबई पोलिसांनी स्वत:हून दाखल केली तक्रार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** आमदार निवासातील उपाहारगृहात कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात अखेर मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झालाय. मुंबई पोलिसांनी शुक्रवारी स्वत: याप्रकरणी सुमोटो तक्रार दाखल करून घेतलीय. संजय गायकवाड यांच्याविरोधात बीएनएस कलम ११५ (२), ३५२, आणि ३(५) नुसार अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलाय. याप्रकरणी आमदार संजय गायकवाड यांच्यासह व्हिडीओत त्या व्यक्तीला मारहाण करणाऱ्या आणखी एकाविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आल्याचं मुंबई पोलिसांनी स्पष्ट केलंय. ही व्यक्ती आमदार गायकावाडांचाच एक समर्थक आहे.

विधानसभेच पावसाळी अधिवेशन सध्या सुरू आहे. त्यानिमित्तानं मंत्रालयाजवळील आकाशवाणी आमदार निवासात असलेल्या उपाहारगृहातून संजय गायकवाड यांनी मंगळवारी रात्री जेवण मागवलं होतं. त्यावेळी शिळी डाळ आणि भात देण्यात आला. तसेच डाळीतून दुर्गंधी येत होती, असा आरोप गायकवाड यांच्याकडून करण्यात आला. याचा जाब विचारण्यासाठी आमदार संजय गायकवाड नको त्या अवस्थेत उपाहारगृहात पोहोचले आणि कर्मचाऱ्याला विचारणा करू लागले. मात्र उपाहारगृहातील कर्मचाऱ्यांकडून कोणतेही समाधानकारक उत्तर मिळत नाही, असं दिसताच त्यांचा पारा चढला आणि त्यांनी कर्मचाऱ्यांच्या कानशिलात लगावत त्याला ठोसे मारण्यास सुरुवात केली.

## मुंबई पोर्ट्सवर डायनामाईटसारखा स्फोट झाला असता, चीनमधून आलेला विस्फोटक साठा; 'बेरुत'सारखी दुर्घटना टळली

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील तीन प्रमुख बंदरे आज एका मोठ्या दुर्घटनेतून थोडक्यात बचावली आहेत. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी वेळीच कारवाई करत मुंबईतील न्हावा शेवा पोर्ट, मुंद्रा पोर्ट आणि कांडला स्पेशल इकॉनॉमिक झोन (एसईझेड) पोर्टवरून ३५ कोटी रुपये किमतीचे १ लाख किलोग्राम फटाके जप्त केले आहेत. हे फटाके बेकायदेशीरपणे चीनमधून आयात करण्यात आले होते. जर डीआरआय अधिकाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप केला नसता, तर ही तिन्ही बंदरे ४ ऑगस्ट २०२० रोजी झालेल्या बेरूत पोर्टवरील स्फोटासारखी झाली असती.

बेरूतमध्ये काय घडले होते?

४ ऑगस्ट २०२० रोजी बेरूत पोर्टवरील गोदाम क्रमांक १२ मध्ये साठवलेल्या २,७५० टन अमोनियम नायट्रेटच्या ढिगाऱ्यात मोठा स्फोट झाला होता. हा स्फोट संध्याकाळी ६:०७ वाजता झाला होता. २०१४ पासून हे रसायन बेरूत बंदरात ठेवण्यात आले होते. या स्फोटाची सुरुवात जवळच्या गोदामात लागलेल्या आगीमुळे झाली होती, जी कदाचित फटाक्यांमुळे लागली असावी. या आगीमुळे अमोनियम नायट्रेटचा स्फोट झाला. ज्याची तीव्रता ०.५ ते १.१ किलोटन टीएनटी इतकी होती. म्हणजेच ५०० ते १,१०० टन डायनामाईट एकाच वेळी स्फोट झाला असता तसाच तो धमाका होता. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे ज्वलनशील पदार्थ ६ वर्षापासून गोदामात पडून होते.

# एकनाथ शिंदे आपल्याच शिलेदारांमुळे चक्रव्यूहात अडकले

## भुमरे, खोतकर, शिरसाटांसह गायकवाडही अडचणीत, नेमकं प्रकरण काय?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या अडचणी सध्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे चित्र आहे. संजय गायकवाड संजय शिरसाट, अर्जुन खोतकर आणि संदिपान भुमरे यांची एका मागून एक प्रकरण समोर आल्यामुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे, तर एकीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिलेदार अडचणीत आले आहेत तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी अचानक केलेला दिल्लीचा दौरा यामुळे नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकीकडे राज्यातील घडामोडी, शिलेदारांवर आलेली संक्रात आणि अचानक केलेली दिल्लीवारी यामुळे एकनाथ शिंदे चांगलेच चर्चेत आले आहेत. या सर्व आरोपांमुळे एकनाथ शिंदे यांचा पक्ष अडचणीत आला आहे.

विट्स हॉटेल प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून उच्चस्तरीय चौकशीच्या आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी संजय शिरसाठ यांना आयकर विभागाची नोटीस आली त्यानंतर त्यांचा नोटांनी भरलेल्या बँगचा एक व्हिडिओ सोशल मीडियावरती व्हायरल झाला. त्यानंतर शिरसाट यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप झाले. संजय शिरसाट यांचा पैशांच्या बॅगेचा शेजारी बसलेला व्हिडीओ समोर आला. या व्हिडीओमध्ये संजय शिरसाट बेडवर बसून सिगारेट ओढत फोनवर बोलत आहेत आणि या बेडखाली पैशांची मोठी बॅग असल्याचं दिसत आहे. तर एक बॅग ठेवलेली आहे. एवढी मोठी बॅग जर पैशाची ठेवायची असेल तर अलमाऱ्या काय मेल्यात का? या बॅगमध्ये पैसे नाहीत तर कपडे आहेत, असा दावाही संजय शिरसाट यांनी केला आहे.

अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक थांबलेल्या विश्रामगृहात कोट्यावधी रुपये आढळल्याने खळबळ उडाली. त्यानंतर माजी आमदार अनिल गोटे यांनी धुळ्याच्या जिल्हा न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर खोतकर यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कायमच आपल्या वादग्रस्त वक्तव्याने आणि कृतीने चर्चेत येणारे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईमध्ये आकाशवाणी आमदार निवास मधील कॅन्टीनच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, त्याचबरोबर अधिवेशनामध्ये देखील हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला. मोठ्या गदारोळ्यानंतर गायकवाड यांच्यावरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र मी केलं ते योग्यच केलं किती गुन्हे दाखल झाले तरी आय डोन्ट केअर असं म्हणत गायकवाड यांनी आपल्या वागण्यावरती स्पष्टीकरण दिलं आहे.

आमदार गायकवाड यांनी आमदार निवास कॅन्टीनमध्ये जेवणं मागवलं होतं. वरण आणि भाताचा पहिला घास खाल्यावरच त्यांना ते खराब असल्याचं लक्षात आलं. त्याच संतापत त्यांनी खाली कॅन्टिनमध्ये जात 'मला विष खायला घालतो का' असं विचारलं आणि कॅन्टिनच्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली. प्लास्टिकच्या पिशवीत पार्सल केलेल्या डाळीला वास येत असल्याचा दावा करत त्यांनी कर्मचाऱ्याला त्याचा वास घ्यायला लावला आणि संजय गायकवाड यांनी त्याला बुक्क्यांनी मारहाण केली.



शिंदे गटाचे शिलेदार संदिपान भुमरे यांच्यावरती मंत्रिपदाचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. आपल्या भाऊजयीला दारू परवाना मिळवून दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या दारू परवाना प्रकरणी छत्रपती संभाजी नगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. खंडपीठाकडून संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसा देखील पाठवण्यात आली आहेत.

सदर प्रकरणानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे संजय गायकवाड आणि संजय शिरसाट यांच्यावर तीव्र नाराज असल्याची चर्चा आहे. संजय गायकवाड आणि संजय शिरसाट यांचे एकनाथ शिंदेंनी कडक शब्दात कान टोचल्याची माहिती समोर येत आहे. मंत्री आणि आमदारांच्या वेशिस्त वक्तव्य आणि वागणुकीमुळे पक्षाची प्रतिमा डागाळत आहे. त्यामुळे असा बेशिस्तपणा खपवून घेणार नसल्याची ताकीद एकनाथ शिंदेंनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्याच शिलेदारांमुळे चक्रव्यूहात सापडलेत. गेल्या तीन दिवसांत शिंदेंच्या तीन मंत्र्यांनी आपल्या कारनाम्यांनी सरकारमध्ये शिंदेंची कोंडी केलीय. संजय गाकवाडांनी आमदार निवासातल्या कॅन्टिनमध्ये गुंडगिरी केली. त्यानंतर शंभूराज देसाईनी भर सभागृहात शिवराळ भाषा वापरत ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार अनिल परबांना धमकी दिली. आणि त्याचवेळी आधी आयकर विभागाच्या नोटीशीमुळे आणि दुसऱ्या दिवशी नोटांच्या बंडलाच्या व्हिडीओमुळे

## युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून

# लोक विठ्ठल रुक्माई च्या दर्शनाला पंढरपूर जातात परंतु मी शेतकऱ्याच्या दर्शनाला आलो, हेच माझे पंढरपूर : बच्चू कडू



**दैनिक आपला विदर्भ**

**दिग्रस/प्रतिनिधी :** विठ्ठल रुक्माई च्या दर्शनाला पंढरपूर जातात परंतु मी शेतकऱ्याच्या दर्शनाला आलो हेच माझे पंढरपूर असे प्रहार पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांनी सांगितले. सरकारने शेतकऱ्यांचा सात- बारा कोरा करावा, या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अमरावती जिल्ह्यातील पापळ गावातून १३८ किमी लांबीची पदयात्रा सुरू केली आहे. ही पदयात्रा आज शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी ८० किमीचा अंतर कापून दिग्रस तालुक्यातील चिरकुटा गावात पोहोचली. चिरकुटा येथील संत सेवालाल महाराज मंदिरात दर्शन घेतल्यानंतर बच्चू कडू यांनी आप्पास्वामी मंदिर परिसरात सभेत उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना संबोधित केले. मी शेतकऱ्यांसाठी लढायला आणि मरायला पण तयार आहे. शेतकऱ्यांसाठी लढताना माझ्यावर पोलिस ठाण्यात ३५० गुन्हे दाखल आहेत. शासनाच्या फसव्या धोरणांनी शेतकऱ्याला नागवले, कर्जाच्या ओझ्याखाली चिरडले, आणि शेवटी आत्महत्या करायला भाग पाडले!'',अशी स्फोटक टीका बच्चू कडूंनी झालेल्या जाहीर सभेत केली.

सातबारा कोरा यात्रेच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सभेत शेकडो शेतकरी, शेतमजूर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सभेत कडूंनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर थेट आणि धारदार भाषेत प्रहार केला. त्यांनी थेट मुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची थट्टा चालली आहे. सातबारा कोरा करण्याची आश्वासने दिली, मात्र आजही सातबाऱ्यावर बँकांच्या नोटीसांचा ताबा आहे. चिरकुटा येथील सभा आटोपल्यावर कडू तुपटाकळी येथे मार्गस्थ झाले.

### आता निषेधाला रुमण्यांची धार

दि. १४ जुलै रोजी अंबोडा येथे जाहीर सभा होणार आहे. हे केवळ ठिकाण राहणार नसून क्रांतीचा टप्पा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन रूमणे घेऊन सहभागी व्हावे. रूमने केवळ प्रतिकात्मक शस्त्र नाही, तर सरकारच्या झोपेचं औषध आहे, असेही कडू म्हणाले.

### बच्चू कडूंचा उठावाचा इशारा

शासनाला हलवायचं असेल, तर लोकांनी उठाव करावा लागेल. सभा संपताना बच्चू कडूंनी सांगितले, हे लढा कोणत्याही पक्षाचा नाही, हा लढा मातीशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांचा आहे. आता जर आपण एकत्र आलो नाही, तर आपलं भवितव्य कायमचं गहाण राहील.

## अल्पभूधारक बेरोजगार तरुणांसोबत लग्न करणाऱ्यास
# अकरा लाखाचा शासकीय निधी द्या

**माजी मंत्री सुबोध सावजी यांचे मुख्यमंत्री राज्यपाल यांना निवेदनाद्वारे मागणी**

**दैनिक आपला विदर्भ**


**डोणगाव/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यात अशिक्षीत, भूमीहिन, अत्यल्प भूधारक शेतकरी, तरूणांसोबत लग्न करणाऱ्यास लग्नात ११ लाख रुपये शासकीय निधी देण्याची योजना सुरू करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मंत्र्यांना १२ जुलै रोजी निवेदनाद्वारे केली आहे.



मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,महाराष्ट्र राज्यात अशिक्षित, अत्याअल्पभूधारक अशा तरूणांचा लग्नाचा अतिबीकट प्रसंग निर्माण झालेला आहे. गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून हा प्रश्न राज्यात भेडसावत आहे.लग्न होत नाही, म्हणून पश्चिम महाराष्ट्रात शेकडो तरूणांनी लक्ष्य वेधण्याकरिता प्रदर्शन केले होते. लग्न न होण्याच्या प्रक्रियेत गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून विशेषतः ग्रामीण भागात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.

शैक्षणिक दृष्ट्या ही बाब महाराष्ट्र राज्यात अतिशय चिंतीची आहे.अशिक्षित किंवा जेमतेम शिकलेली मुलगी नवरदेव हा सरकारी नौकरदार घरी थोडीफार जमीन असणारा शहरात राहणाराच पाहिजेत. यामुळे राज्यात मुलांचे आईवडील अतिशय चिंतेत आहेत.सदर मागणीवर सखोल अभ्यास करून किंवा एक उच्चस्तरीय समिती नेमून या प्रश्नांवर सखोल अभ्यास करावा,प्रत्येक लग्न अकरा लाख रूपये घेवुन विवाह संबंध झाल्यानंतर मुलाने किंवा मुलीने शासकीय योजनेची फसवणूक केल्यास एफ.आय.आर. दाखल करून कठोरात कठोर शिक्षा होईल असा कायदाही पारीत करावा.राज्यामध्ये आपण नवीन महामार्ग, उड्डानपुले बांधण्यात लाखो करोडो रूपये खर्च करीत आहात यांच बरोबर येणाऱ्या पाच वर्षाकरिता जन्मदर वाढविणे मार्गाकरिता लाखो करोडो रूपये निधी खर्च करावा अन्यथा राज्यात शैक्षकिण दृष्ट्या बिकट परिस्थिती निर्माण होवुन लग्नापासून वंचित राहणारे तरूण नक्षलवाद्यांच्या विचारावर जावू शकतात. त्यामुळे सदर योजना लागू करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह इतर मंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## आता ट्रेन सुटण्याच्या ८ तास आधी पाहायला मिळणार आरक्षण चार्ट, या दिवसापासून सेवा सुरुवात



**मुंबई/प्रतिनिधी :** रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर सेवा देण्यासाठी आणि त्यांचा प्रवास अधिक चांगल्या पद्धतीने नियोजित करता यावा, यासाठी मेल आणि एक्सप्रेस ट्रेनच्या तयारीच्या आणि आरक्षण चार्टच्या वेळेत सुधारणा करण्याचा निर्णय वेस्टर्न रेल्वेने घेतला आहे. रेल्वेचे तिकिट आरक्षित केलेल्या प्रवाशांचे नाव, कोच क्रमांक आणि बर्थची माहिती असलेले आरक्षण चार्ट तयार केले जातात. स्थानक किंवा दूरच्या स्थानकातून ट्रेन सुटण्याच्या ४ तास आधी ही यादी प्रसिद्ध केली जाते. पण आता हा चार्ट आठ तास आधी जारी केला जाईल.

सेवा कधी सुरु होणार?

१४ जुलैपासून याची अंमलबजावणी केली जाईल, पश्चिम रेल्वेकडून सांगण्यात आलं आहे. ट्रेनच्या नियोजित सुटण्याच्या अर्धा तास आधीच अंतिम आरक्षण चार्ट तयार केला जाईल. प्रवासी अंतिम यादी तयार होईपर्यंत रिक्त बर्थसाठी आरक्षण करू शकतील. सुधारित वेळापत्रकानुसार, सकाळी ०५:०१ ते दुपारी २:०० या वेळेत निघणाऱ्या गाड्यांचा पहिला आरक्षण चार्ट आता आदल्या दिवशीच्या रात्री ९:०० वाजता तयार केला जाईल. दुपारी २:०१ ते ४:० या वेळेत निघणाऱ्या गाड्यांचा पहिला आरक्षण तक्ता त्या दिवशी सकाळी ७:३० वाजता तयार होईल. सायंकाळी ४:०१ ते रात्री ११:५९ आणि मध्यरात्री ००:०० ते सकाळी ०५:०० या वेळेत निघणाऱ्या गाड्यांचा पहिला आरक्षण चार्ट नियोजित प्रस्थान वेळेच्या आठ तास आधी तयार जाहीर केला जाईल.

रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, दुसऱ्या आरक्षण चार्टच्या नियमांमध्ये कोणताही बदल होणार नाही. ट्रेनच्या नियोजित सुटण्याच्या ३० मिनिटे आधीच अंतिम आरक्षण चार्ट तयार केला जाईल. प्रवासी अंतिम यादी तयार होईपर्यंत रिक्त बर्थसाठी आरक्षण करू शकतील. हा निर्णय प्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे नियोजन चांगल्या पद्धतीने करता यावे आणि शेवटच्या क्षणी गोंधळ व गर्दी टाळता यावी या उद्देशाने घेतला आहे.

### फिल्मफेअर अवॉर्ड्समध्ये अभिनेत्री तब्बूने साधला मराठीत संवाद, महेश मांजरेकरांना केलं सन्मानित...

**मुंबइ/प्रतिनिधी :** : अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक महेश मांजरेकर आता पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नुकताच 'फिल्मफेअर मराठी २०२५' सोहळा पार पडला. या सोहळ्यात चित्रपटसृष्टीतल्या दिग्गजांना सन्मानित करण्यात आलं. या सोहळ्यातील काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अभिनेत्री तब्बू मराठी भाषेत बोलताना दिसत आहे. 'फिल्मफेअर मराठी २०२५' सोहळ्यात अनेक बॉलिवूड कलाकारांनी हजेरी लावली होती. हा कार्यक्रम भव्य स्वरुपात पार पडला.

'फिल्मफेअर मराठी २०२५'मध्ये तब्बू मराठीत बोलली : दरम्यान 'फिल्मफेअर मराठी २०२५' सोहळ्यात तब्बू 'देसी लूक'मध्ये दिसली. याशिवाय स्टेजवर मराठीत उपस्थितांशी संवाद साधत तिने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. तब्बूनं महेश मांजरेकरचे आभारदेखील मानले. तब्बू स्टेजवर मराठीत म्हणाली, ''नमस्कार, मी आज खूप खूश आहे. या सन्मानासाठी खूप आभार...मी हा अवॉर्ड अशा दिग्दर्शकाला देत आहे ज्यानं मला माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा सिनेमा आणि महत्त्वाची भूमिका दिली. मांजरेकर...''

महेश मांजरेकरनं केलं तब्बूचं कौतुक : स्टेजवर महेश मांजरेकर येताच तब्बूनं त्यांना मिठी मारली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर महेश मांजरेकर यांनी प्रतिक्रिया दिली की, ''मला ट्रॉफी मिळाल्याचा आनंद तर आहेच, पण त्यापेक्षा जास्त आनंद हा पुरस्कार माझी मैत्रीण तब्बूच्या हातून मिळाल्याचा आहे. माझ्या मते ती जगातील बेस्ट अभिनेत्री आहे.

# जायकवाडीत ७३ टक्के पाणीसाठा, पण मराठवाड्यातील इतर प्रकल्पांची स्थिती काय?

**दैनिक आपला विदर्भ**

**संभाजीनगर/प्रतिनिधी :** पावसाळा सुरू झाला असून, मराठवाड्यासाठी कही खुशी कही गम अशी परिस्थिती आहे. एकीकडे नाशिक भागात झालेल्या चांगल्या पावसामुळे जुलै महिन्यातच जायकवाडी धरण ७३ टक्क्यांपेक्षा जास्त भरले असताना इतर प्रकल्प मात्र अद्याप निम्म्याहून कमी तर काही प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा शिल्लक राहिला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण अवघे ५० टक्के इतके असल्याने शेतकरी हवालदिल झालाय. लावलेल्या पिकांना पाणी कमी पडल्याने काही प्रमाणात कीड लागलेली असल्याने दुबार पेरणीचे संकट अनेकांवर ओढवले आहे.

नाशिकच्या पावसाने धरणात पाणी : राज्यात बहुतांश भागात पावसाने जोर धरला असला तरी मराठवाड्यात पावसाने अद्याप जोर धरलेला नाही. मात्र, नाशिक जिल्ह्यात पावसाने जून महिन्यात दमदार हजेरी लावली अन् जायकवाडीच्या दिशेने पाणी झेपावले. मागील २५ वर्षात पहिल्यांदाच जायकवाडी प्रकल्पात जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पाणी दाखल झाले आहे. मिळालेल्या आकडेवारीनुसार, शनिवार सकाळपर्यंत ७३.१८ टक्के जलसाठा झाला आहे. सद्यस्थितीत जवळपास २० हजार क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. मागील वर्षी १२ जुलै रोजी धरणात अवघे ४ टक्के पाणी शिल्लक राहिले होते. आशिया खंडातील सर्वात मोठे धरण अशी ओळख असलेले धरण म्हणून जायकवाडी परिचित आहे. पाण्याचा ओघ असाच राहिला तर महिन्याच्या शेवटपर्यंत धरण ९० टक्क्यांपेक्षा अधिक भरल्यास धरणाचे दरवाजे उघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राहत्या बंगल्यात जळालेल्या नोटांची पोतीच्या पोती सापडलेल्या न्यायमूर्ती यशवंत वर्मांना अखेर हटवण्याची तयारी सुरु

## ६४ पानांच्या अहवालातील ५ मोठे मुद्दे

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना हटविण्यासाठी केंद्र सरकारने संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी लोकसभा खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जात आहेत. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, अनेक खासदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत. यावरून असे दिसून येते की लोकसभेत हा प्रस्ताव आणता येतो. लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी किमान १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत. त्याच वेळी, राज्यसभेत ही संख्या ५० खासदारांची आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आधीच सांगितले आहे की न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याचा प्रस्ताव २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात आणला जाईल. १४ मार्चच्या रात्री लुटियन्स दिल्ली येथील न्यायमूर्ती वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानाच्या स्टोअर रूममध्ये आग लागली. येथे ५०० रुपयांच्या जळालेल्या नोटांच्या गठ्ठ्यांनी भरलेली पोतीच्या पोती सापडली होती. वर्मा सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्‍ आहेत. त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून बदली करण्यात आली होती. तथापि, त्यांना कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन काम सोपवण्यास मनाई आहे.

रोख प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या पॅनलचा अहवाल १९ जून रोजी बाहेर आला. ६४ पानांच्या अहवालात म्हटले आहे की न्यायमूर्ती यशवंत वर्मा आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा स्टोअर रूमवर गुप्त किंवा सक्रिय नियंत्रण होते. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती शील नागू यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या पॅनलने १० दिवस तपास केला. ५५ साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आणि न्यायमूर्ती वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानाला भेट देण्यात आली. अहवालात असेही म्हटले आहे की रेकॉर्डवरील पुरावे लक्षात घेऊन, पॅनल २२ मार्च रोजीच्या सरन्यायाधीशांच्या पत्रात केलेल्या आरोपांमध्ये पुरेसे तथ्य असल्याचे मान्य करते. आरोप इतके गंभीर आहेत की न्यायमूर्ती वर्मा यांना काढून टाकण्यासाठी कार्यवाही सुरू करावी. अहवालातील ५ मोठे मुद्दे काय आहेत पाहूया..

१० प्रत्यक्षदर्शींनी अर्धवट जळालेल्या रोख्या पाहिल्या, त्यापैकी दिल्ली अग्निशमन सेवा, पोलिसांचे अधिकारी होते. त्या सर्वांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्या घराच्या स्टोअर रूममध्ये जळालेल्या नोटांचे ढीग पाहिले होते.

इलेक्ट्रॉनिक पुरावे (स्टोअर रूमचे व्हिडिओ-फोटो) प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांची पुष्टी करतात. न्यायमूर्ती वर्मा यांनी घटनास्थळी घेतलेला व्हिडिओ आणि आरोप देखील नाकारले नाहीत. न्यायमूर्ती वर्मा यांचे दोन घरगुती कर्मचारी राहिल/हनुमान पार्शद शर्मा आणि राजिंदर सिंग कार्की यांनी स्टोअर रूममधून जळालेल्या नोट्स काढल्या होत्या. दोघांचेही आवाज व्हायरल व्हिडिओशी जुळले. न्यायमूर्ती वर्मा यांची मुलगी दियाने व्हिडिओबद्दल खोटे विधान दिले. कर्मचाऱ्याचा आवाज ओळखण्यास नकार दिला, तर कर्मचाऱ्याने स्वतः कबूल केले की तो आवाज त्याचा आहे. कुटुंबाच्या परवानगीशिवाय कोणीही येऊ शकत नव्हते, म्हणून न्यायाधीशांच्या स्टोअर रूममध्ये नोट्स ठेवणे जवळजवळ अशक्य आहे, कारण १+४ सुरक्षा रक्षक





आणि एक पीएसओ नेहमीच गेटवर लक्ष ठेवण्यासाठी तैनात असतो.

न्यायमूर्ती वर्मा यांनी स्टोअर रूममध्ये रोख रक्कम सापडल्याच्या घटनेला कट म्हटले, परंतु पोलिसांना तक्रार केली नाही. अलाहाबाद उच्च न्यायालयात हस्तांतरण शांतपणे स्वीकारले. त्या रोख रकमेचा कोणताही हिशेब नव्हता, न्यायमूर्ती वर्मा त्याचा हिशेब देऊ शकले नाहीत. उलट, त्यांच्याविरुद्ध कोणीतरी कट रचला आहे असे म्हटले जात होते.

अर्ध्या जळालेल्या नोटा सापडल्याची बातमी समोर आल्यानंतर, तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी २२ मार्च रोजी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक पॅनेल स्थापन केली होती. पॅनेलने ४ मे रोजी सरन्यायाधीशांना आपला अहवाल सादर केला. त्यात न्यायमूर्ती वर्मा यांना दोषी ठरवण्यात आले. अहवालाच्या आधारे, 'इन-हाऊस प्रोसिजर' अंतर्गत, सरन्यायाधीश खन्ना यांनी सरकारला न्यायमूर्ती वर्मा यांना काढून टाकण्याची शिफारस केली होती. चौकशी समितीमध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, हिमाचल उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जीएस संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अनु शिवरामन यांचा समावेश होता.

## संक्षिप्त...

### ठाकूरवाडीच्या विद्यार्थ्यांची उपरोधिक मागणी: चंद्रावर जाऊ, पण शाळेपर्यंत रस्ता द्या!

दैनिक आपला विदर्भ

**पालघर/प्रतिनिधी :** एकीकडे पालघर जिल्ह्यात हजारो कोटींचे प्रकल्प, बुलेट ट्रेन आणि भव्य रस्ते आकाराला येत असताना, दुसरीकडे मोखाडा तालुक्यातील पोशेरा ग्रामपंचायतीमधील ठाकूरवाडी येथील विद्यार्थ्यांची अवस्था मात्र अत्यंत बिकट आहे. निरगुडवाडी येथील प्राथमिक शाळेत जाण्यासाठी सुमारे एक किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याने, चिमुकल्या विद्यार्थ्यांना दररोज चिखल आणि पाण्याने भरलेल्या वाटेतून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. या विदारक परिस्थितीमुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी सरकारला उपरोधिक मागणी केली आहे: ''आम्ही शाळा शिकून चंद्रावर, मंगळावरही जाऊ, पण शिक्षण घेण्यासाठी शाळेपर्यंत रस्ता तरी द्या!''

ठाकूरवाडीतील जवळपास १५ ते २० विद्यार्थी दररोज निरगुडवाडी येथील शाळेत पायी जातात. हे अंतर १ ते दीड किलोमीटरच्या आसपास असल्याने येथे बससेवेचा प्रश्नच येत नाही, कारण जिथे चालण्यासाठीही धड रस्ता नाही, तिथे बस जाणे अशक्य आहे. त्यामुळे पाठीवर दप्तर घेऊन हे विद्यार्थी दररोज ये-जा करतात.

मात्र, पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते आणि चिखल होतो. या चिखलातून वाट काढत विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. अनेकदा रस्त्यावर पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना भिंतीवरून उड्या मारून जावे लागते. नुकतीच एका विद्यार्थ्याचा उडी मारताना पडल्याची घटनाही ग्रामस्थांनी सांगितली.

या बिकट परिस्थितीमुळे पालकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात मुलांना शाळेत सोडण्यासाठी पालकांना आपली कामे सोडून त्यांच्यासोबत जावे लागते. ''रस्ता चांगला केला तर एखादी गाडी किंवा मुले चालतही कोणत्याही अडचणीशिवाय जाऊ शकतील,'' असे एका ग्रामस्थाने सांगितले.

जर हीच परिस्थिती राहिली, तर पावसाळ्यात मुलांना शाळेत पाठवणार नाही, असा इशाराही संतप्त पालकांनी दिला आहे. याला सर्वस्वी सरकार जबाबदार असेल, असे ते म्हणाले. अन्यथा, बांधकाम विभागाच्या कार्यालयातच शाळा भरवू, असेही त्यांनी उपरोधिकपणे सुनावले आहे.

जिल्ह्यात सुरू असलेल्या मोठ्या प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर, मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या या विद्यार्थ्यांची ही व्यथा प्रशासनासाठी नक्कीच विचार करायला लावणारी आहे. या चिमुकल्यांच्या शिक्षणाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

### जीएसटी अधिकाऱ्याने फसवलं, नाशकात तरुणाच्या वडिलांनी संपवलं जीवन, चिठ्ठीत डायरीचा उल्लेख

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका व्यक्तीने जीएसटी अधिकाऱ्याने फसवणूक केल्यामुळे टोकाचं पाऊल उचललं आहे. त्यांनी आपल्या मामेभावाच्या घरी जाऊन जीवन संपवलं आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहिली आहे. ज्यात आत्महत्येचं कारण लिहिलं असून जीएसटी अधिकाऱ्याने फसवणूक केल्याचं लिहिलं आहे. जोपर्यंत पैसे मिळत नाहीत, तोपर्यंत अंत्य संस्कार करू नका, असंही त्यांनी चिठ्ठीत म्हटलं आहे.

प्रवीण सोनवणे असं आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचं नाव आहे. त्यांनी आपल्या मुलाला सरकारी नोकरी लागावी, यासाठी जीएसटी विभागात कार्यरत असलेले अधिकारी सचिन चिखले यांना सव्वा कोटी रुपये दिले होते. पण चिखले यांनी त्यांच्या मुलाला आणि नातेवाईकांच्या मुलांना नोकरी दिली नाही. तसेच नोकरी देण्यासाठी घेतलेले पैसेही परत केले नाहीत. यामुळे नैराश्यात गेलेल्या प्रवीण सोनवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

'मी किती पैसे दिले आहेत, ते डायरीत लिहून व्हाट्सएप केले आहे. हे पैसे मिळाल्याशिवाय माझा अंत्यविधी करू नये' अशी चिठ्ठी लिहून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं आहे. त्यांनी सिडको परिसरातील मामेभावाच्या घरी जाऊन आत्महत्या केलीये. या घटनेने हळहळ व्यक्त होत असतानाच तरुणांना नोकरीचे आमिष दाखविणाऱ्या जीएसटीचे निरीक्षक सचिन बबनराव चिखले याची ठगगिरीही उघडकीस आली आहे. त्याच्यावर अंबड पोलिसांनी आत्म हत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण सोनवणे यांना त्यांच्या ओळखीचे सचिन चिखले याने म ुलास आणि इतर नातेवाइकांच्या मुलांना नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले होते. त्यासाठी आरोपीनं सोनवणे यांच्याकडून वेळोवेळी सव्वा कोटी रुपये घेतले. मात्र नोकरीस लावून दिलं नाही. चिखले याच्याकडे पैसे मागितले असता त्याने परतही दिले नाही. सोनवणे यांनी ज्या लोकांकडून उसने पैसे घेतले होते. त्या पैशांसाठी लोक तगादा लावत होते. यामुळे ते म ानसिकदृष्ट्या खचले. त्यातून त्यांनी नाशिकच्या सिडकोत गळफास घेत जीवन संपविले आहेत. त्यावरून अंबड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलाय.

## जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष पदावरून पायउतार होताच अजितदादांच्या आमदाराकडून ऑफर, म्हणाले...

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्षपदातून म ुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली होती. पवार साहेबांनी मला भरपूर संधी दिल्या. तब्बल सात वर्षे मी या पदावर काम केले. आता नव्या चेहऱ्यांना संधी देणं गरजेचं आहे. तुमच्यासमोरच मी साहेबांना विनंती करतो, शेवटी हा पक्ष पवार साहेबांचाच आहे. त्यांनी यावर योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला अजून खूप पुढे जायचं आहे, असे त्यांनी म्हटले होते. आता जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर येत आहे. त्यांच्या जागी शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड होणार असल्याची माहिती सम ोर आली आहे. जयंत पाटील प्रदेशाध्यक्षपदावरून पायउतार होताच आता त्यांना अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी ऑफर दिली आहे.

संग्राम जगताप म्हणाले की, जयंत पाटील हे राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नसताना अनेक वेळा त्यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांच्या उद्घाटनाला देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती असायची. मात्र, प्रदेशाध्यक्ष झाल्यावर ते थांबले. जयंत पाटील हे राजकीय दृष्ट्या राष्ट्रवादीत अस्वस्थ आहेत, असं बोललं जायचं. अस्वस्थपणामुळे त्यांनी राजीनामा दिला असावा, असे त्यांनी म्हटले आहे. तर जयंत पाटील हे वेगळ्या पक्षात जातील, अशीही चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत संग्राम जगताप यांना विचारले असता ते जर राष्ट्रवादी अजित पवार गटात आले तर आम च्यासारखे कार्यकर्ते त्यांचे स्वागतच करतील, असे त्यांनी म्हटले आहे.

## शरद पवार यांनी भाकरी फिरवली; प्रदेशाध्यक्षपदाच्या बदलाबाबत बावनकुळेंची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरुन जयंत पाटील पायउतार झाले आहेत. जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. आता शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. दरम्यान, आगामी निवडणुकांच्या तोंडावर शरद पवार यांनी पक्षात भाकरी फिरवली असून खांदापालट केलं आहे. अशातच राष्ट्रवादीतील या नव्या प्रदेशाध्यक्षपदाच्या बदलाबाबत भाजपचे नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहिली प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. प्रत्येक पक्षात वरिष्ठ नेतृत्व किंवा संघटना निर्णय घेते, तेव्हा प्रदेशाध्यक्ष बदलत असतात. भाजपमध्ये रवींद्र चव्हाण प्रदेशाध्यक्ष झाले, पूर्वी मी होतो, हा एक प्रक्रियेचा भाग आहे. जयंतराव खूप दिवसापासून तिथे प्रदेशाध्यक्ष होते, आता हा बदल हा त्यांच्या पक्षाच्या प्रक्रियेचा भाग आहे. अशी प्रतिक्रिया महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिली. ते नागपूर येथे बोलत होते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ले आता युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत आले आहे. ही भारतीयांचे, शिवप्रेमींचे आनंद द्विगुणीत करणारी बाब आहे. आम्ही महाराष्ट्राच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे आभार व्यक्त करतो.

# ग्रामीण पाणीपुरवठा व पेयजल योजनेच्या कामाची चौकशी अहवाल सादर करा

## राज्य पाणी स्वच्छता विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांचे सीईओंना पत्र

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** ग्रामीण पाणी पुरवठा योजना व डोणगाव येथील राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला आहे.या संदर्भात डोणगाव येथून झालेल्या तक्रारी ची दखल त्या तक्रारीनुसार सदर कामाची चौकशी करून तक्रारदारांच्या तक्रारीचे निरासन करावे. कारवाई संदर्भात केलेला चौकशी अहवाल कार्यालयात सादर करावा, असे पत्र पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे कक्ष अधिकारी यांनी बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व जीवन प्राधिकरण विभागाचे मुख्य अभियंता यांना दिले आहे. सदर पत्रावर आता काय कारवाई होते. याकडे आणि काय घबाड बाहेर येते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे कक्ष अधिकारी विजय जयकर यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे मुख्य अभियंता यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, डोणगाव येथील शेख आयुब शेख गुलाब यांनी सदर कामाबाबत तक्रारी करण्यात केलेली आहे.बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने स्वीकारलेले चुकीचे अंदाजपत्रक तसेच शासनाच्या नियम व अटी शर्ती धाब्यावर बसून नियमबाह्य पद्धतीने कंत्राटदारांना कामे दिले आहेत. त्यामुळे डोणगाव येथील राष्ट्रीय पेयजल योजनेची खालील मुद्द्यांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या संदर्भात कारवाई केलेला अहवाल कार्यालयास सादर करावा. तसेच शेख अय्युब शेख गुलाब यांच्या तक्रारीचे निराकरण आपल्या घरावर करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा, महाराष्ट्र शासन जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन चे कक्ष अधिकारी विजय जायकर यांनी दिले आहे. सदर प्रकरणावर आता अधिकारी काय कारवाई करतात. याकडे जिल्हा वासीयांचे लक्ष लागले आहे.

# गुरुपूजन, भाषण आणि निबंध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी साकारली संस्कारक्षम गुरुपौर्णिमा

## गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी गुरूंच्या कार्याला वाहिला शब्दांजलीचा सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीत गुरु हे केवळ ज्ञानाचे दाता नसून, जीवनाला योग्य दिशा देणारे शिल्पकार मानले जातात. गुरुपौर्णिमा हा दिवस अशा गुरूंच्या योगदानाची आठवण करून देणारा आणि त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. रामा इंटरनॅशनल स्कूल येथे गुरुपौर्णिमा उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. या विशेष दिनानिमित्त शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धा आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गुरु म्हणजे काय?,गुरूचे महत्व अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी




आपले विचार मांडले. अनेक विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्वक भाषण करून प्रेक्षकांची मने जिंकली. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या लेखणीतून गुरुंच्या महत्त्वाचे उत्कृष्ट वर्णन करत गुरुप्रेम प्रकट केले. या स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व, लेखनकौशल्य आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मोठी मदत झाली. स्पर्धेतील निवडक विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी शाळेमध्ये गुरुपूजन सोहळाही पारंपरिक पद्धतीने पार पडला. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रामा इंटरनॅशनल स्कूल ही इंग्रजी माध्यमाची शाळा असुनही भारतीय संस्कृती, परंपरा व संस्कारांचे शिक्षण देण्यावर भर देत आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच मुलांमध्ये चारित्र्य, कृतज्ञता आणि आदर यासारख्या मुल्यांचा विकास करणे, हे या संस्थेचे वैशिष्ट्य ठरते.

# वाशीम बाजार समितीमध्ये चियाला उच्चांकी दर

## २३ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल भाव

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** सोयाबीन उत्पादक जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाया वाशीम जिल्ह्यात आता सोयाबीन बरोबरच चिया या पिकांकडे शेतकरी वळला असून जिल्ह्यात तब्बल ३ हजार ६०० हेक्टरवर चियाचे उत्पादन घेण्यात आले. चियाची रेकॉर्डब्रेक लागवडी नंतर आता येथील बाजार समितीमध्ये चियाला रेकॉर्डब्रेक भाव मिळाला आहे. १२ जुलै रोजी येथील बाजार समितीमध्ये चिया शेतमालाला प्रतिक्विंटल तब्बल २३ हजार ५०० रुपयांचा भाव मिळाल्याने चिया उत्पादक शेतकयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




चियाला सुपरफूड म्हणून ओळखले जाते. चियाचे बियाणे पोषणतत्वांनी समृद्ध ठेवणारे आहेत. प्रथिने आणि तंतूमय पदार्थ शरीराला उर्जा आणि पचन सुधारते. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स- हृदयविकार टाळण्यात मदत, साखर नियंत्रण- मधुमेह रुग्णांसाठी उपयुक्त आहेत. ॲंटीऑक्सिडंट्स- त्वचेचा तजेला टिकवून ठेवते. त्यामुळे चियाची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. चिया पिकाचे उत्पादन व विक्री केवळ मध्यप्रदेशातील निमझ येथे होत होती. त्यानंतर वाशीम बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे व उपसभापती गोर्वधन चव्हाण तसेच सर्व संचालक मंडळ तथा,सचिव वामनराव सोळंके यांनी जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य प्रदेशातील निमझ बाजार समितीचा दौरा करुन शेतकयांकरिता चिया या नवीन पिकांकरिता बाजारपेठ उपलब्ध करुन दिली आहे. तसेच चिया पिकांची बाजारपेठ उपलब्ध करुन देणारी पहिली बाजार समिती आहे. त्याचे फलित आज शेतक?यांना चिया या शेतमालाला चांगला भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील शेतकरी पारंपरिक पिकांपासून वेगळ्या आधुनिक पिकांकडे वळत आहेत. यामध्ये चिया हे पीक अल्पावधीतच शेतकयांसाठी फायद्याचे ठरले आहे. आरोग्यासाठी फायदेशीर असलेल्या या पिकाला बाजार पेठेत मोठी मागणी असल्याने चांगला भाव मिळत आहे

## विविध वृत्त...

### नालंदा अकॅडमी येथे गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** शहरातील नालंदा अकॅडमी येथे गुरुपौर्णिम उत्सव अकॅडमीच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोधिसत्व फाउंडेशनचे अधक्ष्य प्रा.चंदू शिरसाट होते. तसेच मार्गदर्शक म्हणून प्रा. इस्माईल खान पठाण यांची उपस्थिती होती. यावेळी वाशीम करिअर अकॅडमीचे संचालक प्रा. इस्माईल खान पठान यांनी गुरुपोर्णिमेचे महत्व विषद करताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावत असतो. आई-वडील आपल्याला जन्म देतात. परंतु,गुरु आपले भविष्य घडवितात. म्हणून नेहमी शिक्षकांचे आदर आणि सन्मान करावा, या जगातील सर्वात उंच पदावर जाणारा व्यक्ती हा ऐका शिक्षकाच्या हातून घडत असतो आणि त्याच्या भविष्याचा आकार मिळत असल्याचे सांगून गुरुपोर्णिमेचे महत्व विशद केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांचा गुरुपोर्णिमेनिमित्त सत्कार केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. युवराज इंगोले यांनी केले. तर, संदीप पडघाण यांनी आभार मानले. कार्यक्रमाला अकॅडमीतील विद्यार्थ्यांसह इतर मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### कामाच्या शोधात आलेल्या युवकांचा उपचार दरम्यान मृत्यू!; मानोरा पोलीस स्टेशनला आकस्मिक मृत्यूची नोंद

दैनिक आपला विदर्भ

**मानोरा/प्रतिनिधी :** तालुक्यातील पाळोदी येथील युवक कामाच्या शोधात मानोरा येथे ११ जुलैला आला होता. काम करीत असताना छातीत दुखत असल्याने डॉ.महेंद्र चव्हाण यांच्याकडे उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती बिघडल्याने त्याला ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केले असता. वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. राजू मेहरबान ब्राम्हण (३१) असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार पाळोदी येथील राजू ब्राम्हण हा युवक कामाच्या शोधात ११ जुलै रोजी मानोरा येथे त्याचा मित्र संजय साबळेकडे आला. त्याच्या ओळखीने येथील धान्याचे व्यापारी अनिल चांडक यांचे धान्याच्या दुकानात हमालीचे काम मिळाले. एक दीड तास राजू ब्राम्हण या युवकांने काम केले. त्याचे छातीत दुखत असल्याने डॉ. महेंद चव्हाण यांच्या क्लीनिकमध्ये उपचारासाठी भरती केले. डॉ. चव्हाण यांनी इसीजी काढल्यावर त्याला सलाईन लावण्यात आले. उपचार झाल्यावर तो बाहेर जात असताना खाली कोसळला.त्याला तत्काळ ग्रामीण रुग्णालयमध्ये दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. सदर घटनेबाबत संजय साबळे यांनी मानोरा पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केल्याने पोलिसांनी आकस्मित मृत्युंची नोंद घेत प्रकरण तपासात घेतले आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी मृतकाचे शवविच्छेदन केल्यावर शव नातेवाईक यांचे स्वाधीन करण्यात आले. कामाच्या शोधात आलेल्या युवकांचा अचानक मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. मृत्यु नेमका कशामुळे झाला हे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावर कळणार आहे.

### राजधानी दिल्लीत चार मजली इमारत कोसळली; १४ महिन्यांच्या मुलांसह ८ जखमी, ढिगाऱ्यात अजूनही लोक अडकल्याची भीती

**मुंबई/प्रतिनिधी :** शनिवारी सकाळी दिल्लीतील वेलकम परिसरात एक चार मजली इमारत कोसळली. इमारतीत १० जणांचे कुटुंब राहत होते. या अपघातात १४ महिन्यांच्या मुलासह आठ जण जखमी झाले आहेत. अजूनही तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. बचावकार्य सुरू आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, सीलमपूरमधील इदगाह रोडजवळील जनता कॉलनीतील स्ट्रीट क्रमांक ५ मध्ये सकाळी ७ वाजता एक इमारत कोसळली. अग्निशमन दलाच्या सात गाड्या घटनास्थळी उपस्थित आहेत. इतर अनेक संस्था देखील मदत कार्यात गुंतल्या आहेत.

इमारत कोसळली तेव्हा स्थानिक लोक मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. या लोकांनी सर्वप्रथम बचावकार्य सुरू केले. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच ढिगाऱ्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. नंतर अग्निशमन दलाच्या मदतीने तीन जणांना वाचवण्यात आले. ईशान्य दिल्लीचे अतिरिक्त डीसीपी संदीप लांबा म्हणाले की, बचावकार्य सुरू आहे. पोलिस, एनडीआरएफ, नागरी संरक्षण आणि स्थानिक लोक घटनास्थळी काम करत आहेत. स्थानिक लोकांनी बचावकार्यात खूप मदत केली आहे. दरम्यान, दिल्लीतील मुस्तफाबाद परिसरात १८ एप्रिल रोजी चार मजली इमारत कोसळली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला. २० वर्षे जुनी इमारत कोसळल्यानंतर १२ तासांहून अधिक काळ बचावकार्य सुरू राहिले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, इमारतीत २२ लोक राहत होते. त्यापैकी इमारतीचा मालक तहसीन आणि त्याच्या कुटुंबातील ७ सदस्यांचा मृत्यू झाला.

# रिसोड पोलिस स्टेशनच्या नवीन वसाहतीचा प्रश्न लागणार मार्गी..!

**पोलीस विभागाच्या प्रस्ताव आ.झनक यांनी मांडला अधिवेशनात**

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी वर्गाच्या वसाहतीसाठी तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांनी मागणी केली होती. सद्यस्थिती रिसोड पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचा सतत पाठपुरावा करत आहेत.यावर आमदार अमित झनक यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मुद्दा मांडल्याने येथील पोलिस वसाहतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रिसोड शहरासह,तालुक्याची वाढती लोकसंखेवर कायदा सुव्यवस्थेबाबत पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. रिसोड हे अतिशय महत्त्वपूर्ण बाजारपेठ असून शहराच्या मधून रिसोड-मालेगाव,रिसोड-लोणार सरोवर,रिसोड-मालेगाव,रिसोड-वाशीम,रिसोड-हिंगोली सारखे महत्वाचे राज्य मार्ग जातात.परंतु,येथील पोलिस स्टेशन आवारातील पोलीस वसाहती मागील विस वर्षांपासून जीर्ण झालेल्या असल्याने पोलिस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी नाईलाजास्तव कधी अपडाऊन तर कधी शहरातील मिळेल त्या कॉलनी,नगरामध्ये राहातात.. पयार्याने पोलिस स्टेशनच्या अंतरावर असलेल्या पोलीस अधिकारी,कर्मचारी वर्गाला कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास मोठ्या आडचणी निर्माण होत आहेत. यावर तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांनी मागील तीन वर्षापूर्वी रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत वसाहतीसाठी पाठपुरावा केला होता. त्यावेळेस हिंगोली रस्त्यावरील ग्रामीण रूग्णालया समोर हिंगोली रोड लगत गट क्रमांक २०६ मध्ये ईक्लास जमिन उपलब्ध आसलेल्या ठिकाणी नवीन पोलिस वसाहती संदर्भात जागेचे मोजमाप सुध्दा करण्यात आले होते.परंतु, परत पोलिस वसाहतीचा प्रश्न थंडावला होता. परंतु,सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार अमित झनक यांच्या माध्यमातून येथील पोलिस वसाहतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आलेला आहे.त्यामुळे रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत अधिकारी, कर्मचारी वर्गाच्या हक्काच्या वसाहतीचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी शुभसंकेत मिळाल्याने पोलीस कर्मचारी विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### डोंबिवली एमआयडीसीत गढूळ पाण्याचा पुरवठा

**डोंबिवली/प्रतिनिधी :** डोंबिवली एमआयडीसीतील मिलापनगर परिसरात एमआयडीसीच्या जलवाहिनीवरून गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. पालिका हद्दीत डेंग्यु, मलेरिया, टॉयफॉईड आणि इतर साथ आजारांनी डोके वर काढले असतानाच, घरात एमआयडीसीकडून गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने हा पुरवठा तातडीने बंद होईल यादृष्टीने एमआयडीसी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे.

एमआयडीसीतील मिलापनगर भागातील रहिवाशांच्या घरात शुक्रवारी अचानक गढूळ पाण्याचा पुरवठा सुरू झाला. सुरूवातीला दूषित पाण्याचा पुरवठा आपल्याच घरात होत आहे असे नागरिकांना वाटले. यामुळे रहिवाशांनी जलवाहिन्यांची तपासणी केली.

# मराठा न्यायदान कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. वैभव तिफणे

**वाशीम/प्रतिनिधी :** मराठा न्यायदान कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड.वैभव माणिकराव तिफणे यांची निवड झाली आहे. त्यांच्या नियुक्तीचे पत्र मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष अरविंदराव गावंडे यांच्याहस्ते नुकतेच देण्यात आले.




ॲड.तिफणे यांच्या निवड प्रसंगी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके, राज्य उपाध्यक्ष ज्योती कोथळकर, राज्य मार्गदर्शिका सुनीताताई जिचकार, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकराव महाले, जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, हिंगोली जिल्हाध्यक्ष शिवाजीराव ढोकर पाटील, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजाननराव भोयर, जिल्हाध्यक्ष गणेश सुर्वे, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्ष सुरेखाताई आरु, विभागीय सचिव सविताताई बोरकर, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ.विजय काळे, माजी जिल्हाध्यक्ष वसंतराव अवचार, प्रा.भरत आव्हाळे, विभागीय सचिव प्रा.अनंतराव गायकवाड, विभागीय कोषाध्यक्ष प्राध्यापक जानराव देशमुख, मराठा उद्योजक कक्षाचे मावळते जिल्हाध्यक्ष सुनील कदम आदी मान्यवरांची उपस्थिती होती. लवकरच जिल्ह्यातील विधिज्ञांची बैठक लावून सामाजिक विषयावर चर्चा करणार असल्याचे यावेळी ॲड. वैभव तिफणे यांनी सांगितले.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.राजा वामन, माधवराव वानखेडे, पंढरीनाथ काळबांडे, राहुल सोमटकर, जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी स्वाती गोरे, कामिनीताई अवचार, विद्युलता गायकवाड, संध्याताई आव्हाळे, मराठा सेवा संघाचे शिवाजी कव्हर, तेजराव जाधव,अरुण झुंगरे, शेख इसाक, संतोषराव गावंडे, केशवराव वाबळे, उत्तमराव आहेर, बबनराव सुर्वे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# तालुक्यातील सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर
## ५० टक्के जागांवर महिलाराज : प्रस्थापितांचा हिरमोड

दैनिक आपला विदर्भ

**कारंजा/प्रतिनिधी :** तालुक्यातील सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाया ९० ग्रामपंचायत सरपंचपदाकरिता नव्याने आरक्षण सोडत ११ जुलै रोजी कारंजा पंचायत समिती सभागृहात सकाळी तहसीलदार कुणाल झाल्टे व निवडणूक नायब तहसीलदार लक्ष्मण बनसोडे यांच्या उपस्थितीत काढण्यात आली. या पूर्वी १७ एप्रिल रोजी आरक्षण सोडत काढण्यात आली होती. परंतु,त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नव्याने आरक्षण काढण्याचा आदेश दिल्याने ही आरक्षण सोडत ११ जुलै रोजी काढण्यात आली. ग्रामपंचायत निवडणुकीला स्थानिक पातळीवर महत्त्व असल्याने सन २०२५ ते २०३० मध्ये होणाया सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुका लक्षात घेता जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता आरक्षण सोडत काढण्यात आली.

गाव पातळीवरील ग्रामपंचायत सरपंचपद हे अतिशय महत्त्वाचे असल्याने या आरक्षण सोडतीकडे तालुक्यातील गाव पातळीवरील राजकारण्यांचे लक्ष लागले होते. काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीनुसार कारंजा तालुक्यातील ९० ग्रामपंचायती पैकी १८ ग्रामपंचायतीचे सरपंच पद अनुसूचित जाती, ३ ग्रामपंचायतीचे सरपंच पद अनुसूचित जमाती, २४ ग्रामपंचायतीचे सरपंचपद नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि ४५ सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी शिरसोली, कोळी, किन्हीरोकडे, बेलमंडळ, भिवरी, इंझा,लोहगाव, वाघोळा, धोत्रा देशमुख तर, अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी रामनगर, मोहगव्हाण, कामरगाव, शिवनगर, धोत्रा जहागीर, महागाव, पिंपरी वरघट, वापटी आणि पसरणी या गावातील सरपंच पदाचा समावेश आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ढंगारखेड,किनखेड आणि येवता या तीन ग्रामपंचायतीचा समावेश आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी लाडेगाव, पिंपळगाव खुर्द, ब्राह्मणवाडा, गिर्डा, लोणी अरब, मनभा, पोहा, शहा,टाकळी खुर्द, तारखेडा, वडगाव इजारा व दिघी तर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी माळेगाव, आखतवाडा,बांबर्डा, कामठा,वाल्हई, लोहारा, कार्ली, वाई कारंजा, मेहा,मोखड पिंपरी, शेलू बु.,या गावांचा समावेश आहे. सर्वसाधारण प्रवगार्साठी खेर्डा बु., भडशिवनी, पिंपरी मोडक, शेवती, सोमठाणा, भामदेवी, दुघोरा, गायवळ, धनज खु., धानोरा ताथोड, दोनद बु., हिवरा लाहे, खेर्डा कारंजा, म्हसला, पारवा कोहर, पिंपळगाव बु., शिवन बु., सुकळी, विरगव्हाण, वढवी,दादगाव, बेंबळा, व कामठवाडा तर, सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी उंबर्डा बाजार, जानोरी, मुरंबी, धामणी खडी, सोहळ, अंतरखेड, डोंगरगाव, जयपूर, खानापूर, पलाना, यावर्डी, काजळेश्वर, धनज बु., बेलखेड,भुलोडा, जांब, निंबाजहागीर, विळेगाव, वडगाव रंगे, झोडगा,काकडशिवनी व रहाटी या गावांचा समावेश आहे. कारंजा तालुक्यात ९० ग्रामपचायतीपैकी ४५ ग्राम पंचायतीत महिला आरक्षण निघाल्याने निम्म्या ग्रामपंचायतीवर महिलाराज येणार आहे. शुक्रवारी ११ जुलै रोजी सकाळी १११ वाजता कारंजा पंचायत समिती सभागृहात सदर आरक्षण काढण्यात आले. यावेळी कारंजा तालुक्यातील गावा गावातील राजकारणी मंडळी उपस्थित होती.

# दिग्रस ठाणेदार यांचा अवैध धंद्यांवाल्यावर कार्यवाहीचा सपाटा सुरू

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** नव्याने रुजू झालेले ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्या धडक कारवाईने अवैध धंद्यांवाल्याचे धाबे दणाणले असून अवैध धंद्यांवर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिग्रस पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्याचे प्रमाण मागच्या सत्रात विक्रमी वाढ झाली होती. परंतु जेव्हापासून ठाणेदार वैजनाथ मुंडे आले आहे तेव्हापासून अवैध व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरक्षणाय खलनिग्रणाय या ब्रीदवाक्याचे तंतोतंत पालन करणारे गुन्हेगारी क्षेत्रातील लोकाला कोणत्याच प्रकारचा थारा न लागू देणारे ठाणेदार म्हणून ओळख असणारे वैजनाथ मुंडे यांनी दिग्रस पोलीस स्टेशनची धुरा हाती घेतल्या तेव्हापासून पोलीस स्टेशन हद्दीत शांताबाई वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील तुपटाकळी येथील ३ गावठी दारू अड्ड्यावर दिग्रस पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे धाड टाकून तिन्ही दारू अड्ड्यावरून सडवा मोहमाच आणि गावठी दारू जप्त करून जागीच नष्ट केली. ही कारवाई आज दि. १० जुलै रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान करण्यात आली. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी तिघांविरुद्ध विविध कलमांनव्ये गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे. सविस्तर वृत्त असे की, दिग्रस तालुक्यातील तुपटाकळी येथे गावठी दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती दिग्रस पोलिसांना मिळाली. त्यावरून दिग्रस पोलिसांनी तुपटाकळी येथील शेखर शिरसाठ यांच्या घरी धाड टाकून १०० लिटर सडवा मोहमच आणि २५ लिटर गावठी दारू, असा एकूण ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट केला. प्रल्हाद इंगोले याच्या घरी धाड टाकून ३५ लिटर गावठी दारू अंदाजे ३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला. तसेच विनोद चव्हाण याच्या घरी धाड टाकून १०० लिटर गावठी दारू जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. या प्रकरणी दिग्रस पोलिसानी तिन्ही दारू विक्रेत्याविरुद्ध विविध कलमांनव्ये गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे. ही कारवाई ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिग्रस पोलीस कर्मचाऱ्यांनी केली.



